सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

▲ वर्ष २ ▲ अंक : ४७ ▲ मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ ▲ पाने : ४

▲ अमळनेर ▲ किंमत : ३ रुपये Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी

आजचे भाव

२४ सोने ९९.५०% : ₹ १,३५,५००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,२६,०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,०८,४००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ १७४०/-
भाव प्रति १० ग्रॅम

आजचे अभीष्टचिंतन



श्री. प्रशांत पवार,
शिक्षक



श्री. गणेश पाटील
पत्रकार



ॲड. श्री. दिनेश पाटील
अमळनेर



श्री. शशिकांत साळुंखे
अमळनेर



प्रा. सुनील पाटील
अमळनेर



श्री. प्रदीप कंखरे
अमळनेर

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

न्यायालयीन कर्मचारी आजपासून बेमुदत संपावर

अनेक वर्षांपासून मागण्या प्रलंबित; संप यशस्वीतेचा महासंघाचा निर्धार



अमळनेर : 'समान काम-समान वेतन' या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागणीसाठी संपाचा निर्धार करण्याकरिता सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी येथील न्यायालयासमोर एकत्र आलेले कर्मचारी.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : 'समान काम-समान वेतन' या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्व न्यायालयीन कर्मचारी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी बेमुदत संपावर जाणार आहेत. या संपात सहभागी होऊन संप यशस्वी करण्याचा निर्धार येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी केला आहे.

उच्च न्यायालयीन कर्मचारी व राज्यातील दुय्यम न्यायालयांतील कर्मचारी हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तसेच दुय्यम न्यायालयातील कर्मचारी हे अधिक काम करीत असतात. असे असताना दोघांच्या वेतनात मोठी तफावत आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सन २००६ पासून जी वेतनश्रेणी लागू केली आहे तीच वेतनश्रेणी महाराष्ट्रातील सर्व न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना लागू करावी. समान कामाचे समान वेतन मिळावे ही कर्मचारी महासंघाची खूप वर्षांपासूनची मागणी आहे. न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट क, महाराष्ट्र ज्युडिशियल स्टेनोग्राफर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलीफ कर्मचारी महासंघ, न्यायालयीन गट ड कर्मचारी महासंघ या संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी संघटनेने पाठपुरावा केलेला आहे. तरी देखील शासन मागणी मंजूर करण्यात टाळाटाळ करीत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे.

या विषयात मुंबई उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे सादर केला आहे. त्यावर आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी दि. १६ व १७ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून आंदोलन देखील केले होते. तरी देखील शासन दखल घेत नसल्याने मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत.

येथील न्यायालयीन कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आज सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी न्यायालय प्रवेशद्वाराजवळ एकत्र येत बेमुदत संपात सहभागी होण्याचा निर्धार केला. सेवानिवृत्त कर्मचारी महासंघाने या मागणीस पाठिंबा जाहीर केला असून, मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी जळगावात सेवानिवृत्त कर्मचारी एकदिवसीय धरणे आंदोलन करणार आहेत.



जयश्रीताई पाटील बिनविरोध

आमदार अनिलदादा पाटील यांच्या कुटुंबाचे जिल्हा बँकेत पुन्हा वर्चस्व

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माघारीच्या टप्प्यावर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अमळनेर तालुका सोसायटी (मनव विकास सोसायटी) मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी दुपारी स्पष्ट झाले आहे. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रफुल्ल हिरालाल पवार यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गट) आमदार अनिलदादा पाटील यांच्या पत्नी सौ. जयश्रीताई पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्यानंतर विविध मतदारसंघांतील उमेदवारांच्या माघारीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते.

दरम्यान, सौ. जयश्रीताई पाटील यांच्या बिनविरोध निवडीच्या पार्श्वभूमीवर येथील महाराणा प्रताप चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात कार्यकर्त्यांनी सौ. जयश्रीताई पाटील यांना पुष्पहार घालून आनंद व जल्लोष केला.

सहकार क्षेत्रातील नवीन नियमांनुसार दहा वर्षांपेक्षा अधिक कार्यकाळ संचालक म्हणून राहिलेल्यांना उमेदवारी करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर आमदार अनिलदादा पाटील यांना उमेदवारी करता आली नाही. परिणामी त्यांनी पत्नी सौ. जयश्रीताई पाटील यांना उमेदवारी दिली. यानिमित्ताने अनिलदादांच्या परिवारालाच संचालकपदाचा बहुमान मिळाला आहे.

कपड्यांचा ट्रक जाळून ६१ लाखांचा अपहार

चालक फरार; अमळनेर-जळगाव रस्त्यावरील प्रकार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सुरत येथून नागपूरला कपडे घेऊन जाणारा ट्रक अमळनेर-जळगाव रस्त्यावरील मांगीर बाबा टेकडीजवळ पेटवून मालाचा अपहार केल्याचा प्रकार येथे उघडकीस आला आहे. याबाबत ताडे (ता. एरंडोल) येथील चालक संजय रमेश पाटील याच्याविरुद्ध अमळनेर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

सुरत येथील ट्रान्स्पोर्ट व्यावसायिक आकीब शेख यांनी १५ ऑक्टोबर रोजी आयशर ट्रकमधून ५१ लाख रुपयांच्या साड्या व धागे नागपूरला रवाना केले होते. मात्र, १६ ऑक्टोबरला धुळे येथे दुरुस्तीसाठी ट्रक थांबला असल्याचे सांगण्यात आले. दुसऱ्या दिवशी मांगीर बाबा टेकडीजवळ ट्रक व त्यातील माल जळून खाक झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर चालक संजय पाटील याच्याशी संपर्क होऊ शकला नाही.चालकाचा महिनाभर शोध घेऊनही तो मिळून न आल्याने संशय बळावला. साड्यांचे १४३ कार्टून, १ टन ५९ किलो २७० ग्रॅम धागे आणि १० लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण सुमारे ६१ लाख रुपयांचा अपहार व फसवणूक केल्याची फिर्याद देण्यात आली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर तपास करीत आहेत.

अमळनेरला कत्तलखान्यावर छापा

सात जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : 'ऑपरेशन ऑल आऊट' मोहिमेत येथील पोलिसांनी कत्तलखान्यावर छापा घातला. त्यात विविध जनावरांचे ५७० किलो मांस, ५० किलो कातडी आणि हत्यारांसह सात जणांना ताब्यात घेतले. ही घटना सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी पहाटे शहरातील पारधीवाडा भागात घडली. या सातही आरोपींविरुद्ध पशुसंरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी 'ऑपरेशन ऑल आऊट'चे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना कत्तलखान्यात जनावरांची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाली होती. श्री. निकम यांनी उपनिरीक्षक समाधान गायकवाड, हवालदार अशोक साळुंखे, विनोद भोई, विनोद सोनवणे, नितीन मनोरे, विनोद संदानशीव, मंगल भोई यांना पारधीवाडा भागातील मुस्लीम कब्रस्थानानजीकच्या कत्तलखान्यात छापा घालून कारवाई करण्यास सांगितले. पोलीस कत्तलखान्यात पोहोचताच तेथील इक्बाल कुरेशी आणि बाबा कुरेशी पळून गेले. पोलिसांनी घेराव घालून इतरांना तेथून न हलण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसमक्ष पंचनामा केला. तेथेच शेख रमजान शेख मुख्तार, अब्दुल अजीज अब्दुल शकुर, अल्ताफखा अजीजखा पठाण, सलमान रजा सलीम अहमदखान, शेख मुख्तार शेख बिस्मिल्ला (सर्व रा. फरशी रोड, अमळनेर), तसेच इकबाल कुरेशी, बाबा कुरेशी (रा. अमळनेर) हे आरोपी आढळून आले. पोलिसांनी सर्व मांस, हाडे, कातडी, शिंगे जप्त करून पालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत मोठा खड्डा करून त्यात पुरून विल्हेवाट लावण्यात आली. संबंधित आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड तपास करीत आहेत.

मारामारीच्या गुन्ह्यात मंडळाचा विनाकारण उल्लेख; ६१ कार्यकर्त्यांकडून पोलिसांना निवेदन

हरिष भावसारकडून पोलिसांची दिशाभूल करून मंडळाची बदनामी केल्याचा आरोप



अमळनेर : येथील पानखिडकी परिसरात झालेल्या मारामारीच्या गुन्ह्यात जय बजरंग मित्रमंडळाच्या नावाचा विनाकारण उल्लेख करून हरिष भावसार याने त्याच्याविरुद्ध झालेल्या गुन्ह्याला काटशह देण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला, या आशयाचे निवेदन पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना देताना जय बजरंग मित्रमंडळाचे कार्यकर्ते.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पानखिडकी परिसरात झालेल्या मारामारीच्या गुन्ह्यात जय बजरंग मित्रमंडळाच्या नावाचा विनाकारण उल्लेख करून हरिष भावसार याने त्याच्याविरुद्ध झालेल्या गुन्ह्याला काटशह देण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला, या आशयाचे निवेदन जय बजरंग मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की हरिष भावसार याचा जय बजरंग गणेश मित्रमंडळाच्या आर्थिक हिशेबाशी काहीही संबंध नाही. त्याच्यावर झालेल्या गुन्ह्यामुळे व सौरभशी असलेल्या वादातून त्याने पोलिसांची दिशाभूल केली असून, खोटी माहिती देऊन जय बजरंग मंडळ आणि गणेशोत्सव बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आमच्या सामाजिक व धार्मिक मंडळाची समाजात बदनामी झाली आहे. आमच्या मंडळाच्या हिशेबाचा काहीही वाद नाही. त्यामुळे त्यांच्या भांडणात तपासात मंडळ अथवा मंडळाचे कार्यकर्ते याना त्रास व्हायला नको व हरिष भावसार आणि साक्षीदार यांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक गोपी कासार, जितेंद्र पवार, कमलेश गुरव, निखिल चौधरी, गणेश चौधरी, मुकेश पाटील, श्रीकांत करंजे, दिनेश सैंदाणे, हर्षल विसपुते, राज गोलेच्छा, चेतन चौधरी, मनोज पाटील, अमोल चौधरी, हर्षल भावसार, रितेश चौधरी, गणेश जाधव, परेश भामरे, रवींद्र बारी, ऋषिकेश बारी, महेश करंजे, प्रसाद करंजे, प्रशांत चौधरी, वैभव खैरनार यांच्यासह ६१ मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

उधना-छपरा विशेष एक्स्प्रेस आजपासून धावणार

खानदेशातील 'या' ५ रेल्वेस्थानकांवर थांबा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सणासुदीचा काळ आणि रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने उधना ते छपरा दरम्यान विशेष गाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या गाडीमुळे गुजरात, उत्तर महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. या गाडीला जळगाव जिल्ह्यातील अमळनेर, धरणगाव आणि भुसावळ या स्थानकांवर थांबे आहेत. मात्र, जळगावला थांबा देण्याला आलेला नाही.

पश्चिम रेल्वेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार गाडी क्रमांक ०९११५ उधना-छपरा विशेष रेल्वे सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी उधना स्थानकावरून सायंकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी रवाना होईल. प्रवासादरम्यान विविध महत्त्वाच्या स्थानकांवर थांबे घेत ही गाडी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी छपरा स्थानकावर पोहोचणार आहे.

ही गाडी उधना येथून सुटल्यानंतर व्यारा, नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, धरणगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर आणि प्रयागराज छिवकी मार्गे पुढे धावणार आहे. या गाडीला जळगावला मात्र थांबा नाही. प्रवाशांच्या सोयीसाठी या विशेष रेल्वेगाडीमध्ये स्लीपर क्लास आणि जनरल सेकंड क्लासचे डबे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विशेष भाडे आकारणीच्या नियमानुसार ही गाडी धावणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी तिकीट आरक्षित करताना विशेष गाडीचे भाडे आणि उपलब्ध आसनांची माहिती तपासून घेणे आवश्यक आहे.



संपादकीय



दुष्काळाचा दुहेरी भडिमार सुरू

दुष्काळजन्य स्थितीत किती वेगवेगळ्या पद्धतींना सामोरे जावे लागेल याचे चित्र आतापासूनच पाहावयास मिळत आहे. नुकत्याच झालेल्या चक्रीवादळानंतर राज्यभरात कुठे ना कुठे पाऊस पडेल आणि पिण्याच्या पाण्यासाठी थोडासा का होईना परंतु दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु तसे काही झाले नाही. दरवर्षी दिवाळीनंतरही राज्याच्या बऱ्याच भागांत थोडाफार पाऊस पडत असतो. डिसेंबरअखेरीस अवकाळी पावसाचाही एखादा तडाखा येऊन जातो. मधूनमधून येणारा हा पावसाचा शिडकावा जमिनीत पाणी भरण्यासाठी तितकाच उपयोगी ठरत असतो. परंतु यंदा मात्र पावसाळा संपायच्या एक महिना आधीच वरुणराजाने निरोप घेतला. वेधशाळांनी यंदा पाऊस कमी होईल असा अंदाज जरी दिला होता. तरी तो तब्बल महिनाभर आधी निरोप घेईल, याचा वेधशाळांनाही अंदाज आला नाही, ही वस्तुस्थिती आहे. अल निनो या उष्णतेचा हा सगळा परिणाम ठरतो. महाराष्ट्राच्या जवळपास सव्वातीनशे तालुक्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती आहे. ही परिस्थिती केवळ पिण्याच्या पाण्यापर्यंत मर्यादित राहिलेली नाही. त्या त्या तालुक्यात अनेक प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडाही निर्माण होऊ लागला

आहे. राज्याच्या एकूण अर्थचक्रामध्ये शेतीचे मोठे योगदान असते. त्यातून शेतमजुरी करणाऱ्यांना बऱ्यापैकी रोजगारही उपलब्ध होत असतो. यंदा या दुष्काळाने रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याच शेतीवर अवलंबून असणाऱ्या राज्यभरातील पशुधनही यंदा मोठ्या प्रमाणावर संकटात सापडले आहे. चारा किंवा वैरणीची टंचाई ही आतापासूनच भेडसावू लागली आहे त्याचा परिणाम एकूणच राज्याच्या दुग्ध उत्पादनावर होताना दिसतो. गेल्या महिनाभराच्या राज्यातील दूध संकलनात जवळपास दहा टक्क्यांनी घट झालेली आहे. पुढच्या महिन्या-दोन महिन्यांत त्यात आणखी मोठी घट होण्याची भीती व्यक्त होते आहे. राज्यात सर्वसाधारणपणे रोज पावणेदोन कोटी दूध संकलित होते. परंतु आता त्यात दहा टक्क्यांची घट म्हणजे दूध टंचाईच्या दुष्काळाबरोबर दुधाच्या टंचाईची शक्यता व्यक्त होते. संभाव्य टंचाई लक्षात घेऊनच राज्यातील सहकारी आणि खासगी दूध संघांनी आपल्या दूध विक्री दरामध्ये प्रतिलीटर चार रुपयांनी वाढ करण्याचे ठरवले आहे.


राज्याच्या ग्रामीण भागात सर्वाधिक दूध संकलन होते. त्यानंतर ते मुंबई, पुणे, नागपूर या महानगरांसाठी पाठविले जाते. साधारणपणे दरवर्षी उन्हाळ्याच्या आधी म्हणजे मार्च, एप्रिलमध्ये दरवर्षी एक ते दीड रुपयाने प्रतिलीटर दुधात दरवाढ होत असते. मुळातच उन्हाळ्याच्या काळात गाई, म्हशी कमी दूध देतात. हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नाही. कडबा, पुट्टीसारख्या सुक्या चाऱ्यांवर हे पशुधन उन्हाळ्यात पोसले जाते. स्वाभाविकपणे त्याचा दूध उत्पादनावर परिणाम होतो. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये आणि दूध प्रक्रिया उद्योग तोट्यात जाऊ नये म्हणून ही दरवाढ होत असते. परंतु यंदा तब्बल सहा महिने आधीच दुधामध्ये थोडीथोडकी नव्हे तर तब्बल तीन ते चार रुपये प्रतिलीटर दराने वाढ केली जात आहे. याचा सरळ-सरळ अर्थ असा होतो, की ग्रामीण भागातील दूध संकलनात आतापासूनच घट होऊ लागलेली आहे. दुष्काळी भागातील अनेक शेतकऱ्यांना आपल्याकडच्या पशुधनाला पुरेसा चारा कुठून आणायचा असा प्रश्न भेडसावत असल्याने त्यातील अनेकांनी जनावराची विक्री करायला सुरूवात केली आहे. कारण अनेकांना स्वतःच्याच रोजगाराची शाश्वती वाटत नसल्याने जनावराच्या चाऱ्याचा खर्च कसा भागवायचा. असादेखील त्यांच्यापुढे प्रश्न आहे. आताच्या या दरवाढीनंतर पुन्हा मार्च, एप्रिलमध्ये दुधाच्या दरामध्ये अशीच वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सगळ्या दूधाचे दर आता प्रतिलीटर शंभरी पार करतील, अशी स्थिती दिसते. गीर किंवा गावठी गाईच्या दुधाचे जर आताच नव्वद ते शंभर रुपये प्रतिलीटर आहेत. त्यामध्येही पुढच्या काही महिन्यांत पाच ते दहा रुपयांची वाढ नक्कीच होऊ शकते. आधीच रोजगाराचा प्रश्न त्यात पुन्हा दुधासकट अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता, असा हा दुष्काळाचा दुहेरी भडिमार यंदा जवळपास सगळ्यांनाच सोसावा लागण्याची शक्यता आहे. याचाच अर्थ दुष्काळ हा केवळ पाणीटंचाईपुरता मर्यादित राहिला नसून तो वस्तूंच्या टंचाईलादेखील आमंत्रण देणारा ठरतो आहे.

दुधाचे भाव वाढल्याबरोबर दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीतही वाढ अपेक्षित आहे. अगदी रोजच्या चहाच्या दरातही एक ते दीड रुपयाची वाढ ताबडतोब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक दूध संघांनी दूध संकलनात वाढ झाल्याचा जरी दावा केला असला, तरी तो तात्पुरत्या स्वरूपाचा आहे. महिनाभरात होऊ घातलेल्या दूधटंचाईचा अंदाज आल्यानेच त्यांनी आतापासूनच दुधाच्या दरात वाढ करून आपला नफा कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कारण पुन्हा चार-पाच महिन्यांनी याच दूधटंचाईचे कारण सांगून त्यांना दरवाढ करणे सहज शक्य होणार आहे. यापूर्वी ज्या-ज्या वेळी दुष्काळ पडला त्या-त्या वेळी घटच झालेली आहे. सरकारने ग्रामीण भागातील एकूण आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळी भागातील लोकांना रेशन दुकानातून मोफत धान्य देण्याची घोषणा यापूर्वीच केलेली आहे. कारण राज्यातील सव्वातीनशे तालुक्यांमधून यंदा केवळ पंचवीस ते तीस टक्केच धान्य उत्पादन होण्याची अपेक्षा आहे. विशेषतः ज्वारी, बाजरी, मूग, तूर, सोयाबीन, भुईमुगाच्या उत्पादनात अभूतपूर्व घट नोंदली जाईल. राज्याच्याच अन्नधान्य उत्पादनामध्ये होणारा गंभीर परिणाम लक्षात घेऊन केंद्राकडून अन्नधान्याची वाढीव मदत मागण्याशिवाय पर्याय शिल्लक राहत नाही. अन्नधान्य टंचाई जरी निर्माण होणार नसली तरी सर्व जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत पाच ते दहा टक्के वाढ निश्चितपणे गृहित धरली जाते. अशा पद्धतीने दुष्काळाच्या चक्रव्यूहात राज्य अडकले आहे.

एका पिढीचे ढोंग, दुसरीची परंपरा, तिसरीची संस्कृती अन् चौथीचा धर्म!

ढोंग, परंपरा, संस्कृती आणि धर्म हे शब्द उच्चारताच अंगातील रक्त सळसळायला लागते. मी हा केवळ एक विचार मांडत नाही, तर मानवी समाजाची मानसिकता, परंपरांची निर्मिती, धार्मिक समजुतींचे परिवर्तन आणि सांस्कृतिक उत्क्रांती यांचा वेध घेणारा एक सामाजिक पण गंभीर तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचा किंवा समजावून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मला वाटते, की एखादी गोष्ट जुनी आहे म्हणून ती पवित्र ठरत नाही, एखादी गोष्ट परंपरेने चालत आली आहे म्हणून ती योग्य ठरत नाही आणि एखादी गोष्ट धर्माच्या नावाने केली जाते म्हणून ती धर्मसंमत ठरत नाही. जसा काळ पुढे पुढे जातो तसतसे बदल हे अनिवार्य असतात. टेलिग्राफ, डायल करणारा फोन, पेजर, साधा मोबाईल आणि स्मार्टफोन हे एक उदाहरण म्हणून सांगता येतील. एक मूलभूत प्रश्न असा आहे, की आपण ज्या गोष्टीला आज संस्कृती, परंपरा किंवा धर्म म्हणतो, ती खरोखरच आपल्या पूर्वजांच्या तत्त्वज्ञानातून निर्माण झाली आहे का? की एखाद्या काळातील स्वार्थ, सत्तेचे प्रदर्शन, सामाजिक दबाव, अज्ञान अथवा व्यापारी हितसंबंध यातून निर्माण झालेली गोष्ट आहे? आपण पिढ्यान्‌पिढ्या त्या का जपत आलो आहोत? या प्रश्नांचे तांत्रिक, आध्यात्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय अशा पाच अंगांनी विश्लेषण करता येईल.





संजय ऊर्फ उल्हास महाले

१) सामाजिक विवेचन : मानवी समाजात एखादी गोष्ट कशी रुजते? का रुजते? याची एक विशिष्ट प्रक्रिया असते.

पहिली पिढी- एखादी गोष्ट विशिष्ट कारणाने सुरू होते. त्यावेळी त्याचे फायदे-तोटे याचा सारासार विचार केला जात नाही. त्यावेळी असलेल्या परिस्थितीशी अनुरूप असा निर्णय घेतला जातो. त्यात स्वार्थ, सोय, अज्ञान किंवा दिखावा असू शकतो. त्यामागे वैयक्तिक फायदा, सत्ता, प्रतिष्ठा किंवा मनोरंजन यांची सांगड घातली जाते.

दुसरी पिढी- पहिल्या पिढीतील सवय याचे अनुकरण करते. तीच गोष्ट वारंवार केली जाते. तिचे मूळ कारण मागे पडते आणि ती रूढी बनते. रूढी बनल्यानंतर तिला परंपरा बनविण्यात वेळ लागत नाही.

तिसरी पिढी- जी परंपरा आहे तिला सांस्कृतिक ओळख देतो. समाज त्या प्रथेला आपल्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा भाग मानू लागतो. येथे मात्र प्रश्न विचारायची सोय नसते. खरे-खोटे तपासून बघायचे नसते. फक्त जे चालत आले आहे त्याची री ओढत राहायची.

चौथी पिढी- जेव्हा संस्कृती हीच अस्मिता म्हणून मान्यता पावते तेव्हा ती आपोआपच धार्मिक श्रद्धा बनते. याविषयी प्रश्न विचारणे किंवा शंका घेणे म्हणजे अधार्मिकता किंवा धर्मविरोधी, असा प्रकार सहज होतो. त्या प्रथेवर प्रश्न विचारणे म्हणजे धर्मावर प्रश्न विचारणे, अशी मानसिकता तयार होते. यामध्ये सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे मूळ कारणाचा विसर पडणे.

पहिली पिढी एखादी गोष्ट का सुरू केली, हे दुसऱ्या पिढीला माहीत नसते. दुसरी पिढी ती गोष्ट तिसऱ्या पिढीला शिकवते. तिसरी पिढी तिला संस्कृतीचे स्वरूप देते. चौथी पिढी मात्र तिच्या ऐतिहासिक सत्यापेक्षा तिच्या अस्तित्वाला अधिक महत्त्व देते. अशा वेळी तीन गोष्टी घडतात. सवयीचे रूपांतर रूढीत होते. रूढींचे रूपांतर परंपरेत होते. परंपरेचे रूपांतर संस्कृती किंवा अस्मितेत होते. अस्मितेचे रूपांतर श्रद्धेत होते. श्रद्धेचे रूपांतर कट्टरतेत होते. याचा परिणाम असा होतो, की एखादी गोष्ट योग्य आहे की अयोग्य, यापेक्षा ती आपल्या पूर्वजांनी का केली होती? त्याला काय कारणे होती? हे प्रश्न गौण ठरतात आणि आपण कुठलाही विवेक न वापरता घडत आलेल्या गोष्टी जशाच्या तशा स्वीकारतो.

माझे स्पष्ट मत आहे, की

१) प्रत्येक परंपरा ढोंगातून जन्माला येत नाही. प्रत्येक जुनी प्रथा चुकीची नसते. बऱ्याच वेळा परंपरांमागे निसर्गज्ञान, समाजहित, आरोग्य, अध्यात्म आणि सामूहिक कल्याण यांचा विचार असतो. मात्र, त्याला कारणीभूत त्यावेळची परिस्थिती असते. ती तशीच्या तशी स्वीकारणे हे आताच्या जगात अव्यवहार्य आहे. परंपरेचा आदर करणे म्हणजे परंपरेची चिकित्सा करूच नये, असे अजिबात नाही. या दोन्ही पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत.

२) तांत्रिक आणि वैज्ञानिक विवेचन : चला आपण फटाक्यांचे आकर्षण आणि त्यामागील विज्ञान याबद्दल माहिती घेऊया. फटाके म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नाही. फटाके हे रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि तापमानशास्त्र यांच्या एकत्रित प्रक्रियेतून निर्माण होणारा पदार्थ आहे. तो मनोरंजन तसेच आयुधे म्हणून देखील वापरला जातो. फटाक्यांमध्ये किंवा अशा प्रकारच्या आयुधांमध्ये प्रामुख्याने पुढील घटक असतात.

ऑक्सिडायझर : ज्वलनासाठी आवश्यक ऑक्सिजन पुरवणारे रासायनिक पदार्थ.

इंधन : ज्वलनातून ऊर्जा निर्माण करणारे पदार्थ. रंगनिर्मिती करणारी धातूंची संयुगे. ध्वनी निर्माण करणारे आणि दाब वाढवणारे घटक. फटाका, बॉम्ब, रॉकेट किंवा मिसाईल पेटवल्यानंतर किंवा फायर केल्यावर रासायनिक अभिक्रियेतून उष्णता, प्रकाश, वायू आणि ध्वनी निर्माण होतात. फटाके हे मनोरंजनासाठी वापरले जातात आणि आयुधे हे नासधूस करण्यासाठी वापरले जातात. हे तंत्रज्ञान जेवढे विकसित होईल तेवढे मनोरंजन तर जास्त होईलच; परंतु नासधूसही जास्तीत जास्त करता येईल. याबरोबरच पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक दुष्परिणाम आपणास बघायला मिळतील. फटाके किंवा रासायनिक आयुधे यांच्या रासायनिक प्रक्रियेतून सूक्ष्म धूलीकण, विषारी वायू आणि ध्वनिप्रदूषण निर्माण होते आणि त्याची झळ निसर्गाला आणि मनुष्यप्राण्याला बसते. यातून एक प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे एखादी गोष्ट तांत्रिकदृष्ट्या आकर्षक आणि उपयोगी (नकारात्मक दृष्टीने) आहे म्हणून ती पर्यावरण आणि मानवतेच्या दृष्टीने योग्य ठरते का? तर मुळीच नाही. विज्ञान आपल्याला एखादी गोष्ट कशी घडते हे सांगते. पण ती गोष्ट करावी की नाही, याचा निर्णय आपण घेताना नैतिकता, आरोग्य आणि पर्यावरणाचा विचार करायला पाहिजे, असे वाटते.

३) ऐतिहासिक विवेचन : फटाके आणि युद्ध सामग्री भारतात कशी आली? फटाके आणि दारूगोळ्याच्या इतिहासाचे मूळ प्राचीन चीनमध्ये आढळते. साधारण नवव्या शतकात चिनी रसायनशास्त्रज्ञांच्या प्रयोगांतून गनपावडर विकसित झाली. त्यानंतर बांबूच्या नळ्यांमध्ये स्फोटक मिश्रण वापरून आवाज आणि प्रकाश निर्माण करण्याची पद्धत विकसित झाली. पुढे त्याचा वापर उत्सव आणि राजदरबारी मनोरंजनात झाला. भारतामध्ये फटाके कोणी आणले त्यावर बरीत मते-मतांतरे आहेत. १३ व्या आणि १४ व्या शतकात भारतात दारूगोळ्याच्या तंत्रज्ञानाची ओळख होती, असे काही दस्तऐवजांवरून वाटते. कारण तोफा चालविणे हा त्याचाच एक भाग होता. १४४३ मध्ये विजयनगरच्या देवराय द्वितीय यांच्या दरबारातील महानवमी उत्सवात आतषबाजीचे उल्लेख आढळतात. १६ व्या आणि १७ व्या शतकात मुघल राजदरबारात आतषबाजीला मोठे स्थान मिळाले. पुढील काळात यामध्ये मराठा आणि पेशवेही काही मागे नव्हते. त्यांच्या दरबारातही आतषबाजीचे प्रदर्शन होत असे. याच काळात ब्रिटिशांनी बंदुका आणल्या. भारत पारतंत्र्यात गेल्यानंतर ब्रिटिशकाळात फटाक्यांचे उत्पादन आणि व्यापार अधिक विस्तारला. पुढे शिवकाशी हे भारतीय फटाका उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र बनले. त्याचसोबत ठिकठिकाणी दारूगोळ्यांचे कारखानेही सुरू झाले. फटाक्यांचे तंत्रज्ञान चीनमध्ये विकसित झाले. भारतात मध्ययुगीन काळात त्याचा प्रसार झाला आणि विविध राजसत्तांनी त्याला राजवैभव व मनोरंजनाचे स्वरूप दिले, हे जरी खरे मानले तरी एक गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे दिवाळी आणि दीपोत्सवाची परंपरा फटाक्यांपेक्षा खूप जुनी आहे.

दिवाळीचा मूळ सांस्कृतिक आशयच हा प्रकाश, मंगलता, आनंद, समृद्धी आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाशी संबंधित आहे. दिवे लावणे आणि फटाके फोडणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एक पारंपरिक, तर दुसरी रूढीने प्रचलित झालेली आहे. म्हणूनच फटाक्यांना दिवाळीचे अनिवार्य धार्मिक अंग मानणे धाडसाचे ठरेल.

जसजसा काळ पुढे सरकत गेला, तसतसे औद्योगिकीकरण वाढले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. कारखानदारांनी नफा मिळावा म्हणून जाहिरात सुरू केली. बाजारपेठेत भरपूर मालाची आवक झाली. ग्राहकांवर संस्कृतीचा प्रभाव टाकण्यात आला. त्यामुळे फटाके सामान्य माणसाच्या आवाक्यात आले. गरीब लोक स्वस्त व कमी आणि श्रीमंत लोक महाग व भरपूर फटाके खरेदी करू लागले. फटाक्यांना चांगले दिवस आले. त्याचे प्रमुख कारण म्हणजे वेगवेगळे सण-समारंभ, लग्न समारंभ, विजयाचे उत्सव आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामाजिक प्रतिष्ठा यांच्याशी जोडले गेले. कुठल्याही उमेदवाराची विजयी निवडणूक बघा किंवा कुठल्याही लग्नाची वरात बघा म्हणजे मला काय म्हणायचे, ते लक्षात येईल. आतषबाजीशिवाय हे पूर्ण होऊच शकत नाही. फटाके हे रूढी आणि परंपरा यांना जोडले गेल्यामुळे फटाक्यांचे उत्पादन आणि विक्री भरमसाठ वाढली. सर्व सण-समारंभांत आणि निवडणुकांमध्ये फटाक्यांचा सर्रास वापर होतो. फटाक्यांच्या व्यापारीकरणाने त्याचे प्रमाण, उपलब्धता आणि लोकप्रियता वाढली हे मात्र खरे.

४) आध्यात्मिक विवेचन : धर्माचा आणि फटाक्यांचा काय संबंध. धर्माचा अर्थ काय? धारण करण्यायोग्य तत्त्व म्हणजे धर्म. धर्माची मूलभूत मूल्ये ही सत्य, अहिंसा, दया, करुणा, संयम, कर्तव्य, परोपकार आणि सर्व जीवांविषयी आदर ही आहेत. भारतात बहुदा सर्वच सणांची सांगड धर्माबरोबर घातल्यामुळे त्यावरील भाष्य हे इतरांना रुचत नाही आणि पटतही नाही. उदाहरण म्हणून सांगतो, की दिवाळीच्या दिवशी आपण लक्ष्मीपूजन करतो. समृद्धीची प्रार्थना करतो. घरात दिवे लावतो. एकमेकांना शुभेच्छा देतो. पण त्याचवेळी आपला उत्साह, आनंद आणि प्रामुख्याने आपल्या बडेजावपणाचे प्रदर्शन करण्यासाठी फटाके फोडतो. पण त्यासोबत दुसऱ्या जीवाला किंवा मानवाला त्रास होत असेल, तर त्या आनंदाच्या स्वरूपाचा विचार करणे आवश्यक नाही का? फटाके फोडल्याने काय होऊ शकते? फटाक्यांच्या आवाजाने वृद्धांची झोपमोड होते. लहान मुलांना आणि आजारी व्यक्तींना त्रास होतो. पक्षी आणि प्राणी भयभीत होतात. वातावरणात धूर आणि प्रदूषण वाढते. हा खूप मोठा प्रश्न आहे. तो पर्यावरणाच्या दृष्टीने आणि मानवासाठीही घातक आहे.

मग प्रश्न असा आहे, की आपल्या आनंदाला दुसऱ्याच्या वेदनेची किंमत का असावी? माझे स्पष्ट मत आहे, की फटाके आणि सण यांचा दुरान्वयेही संबंध नाही. फटाके फोडणारा हा धार्मिक असायलाच पाहिजे, असे काही नाही. जे लोक फटाके फोडत नाहीत ते अधार्मिक आहेत, असेही मुळीच नाही. फटाके फोडणे हा मुद्दा व्यक्तीच्या श्रद्धेचा नव्हे; तर श्रद्धेच्या नावाखाली एखाद्या प्रथेची अनावश्यक सक्ती करण्याचा आहे. धर्म आपल्याला विवेक शिकवतो. विवेक हरवला की धर्माच्या नावाखाली कर्मकांडाला महत्त्व प्राप्त होते. अशा कर्मकांडामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. जेव्हा दोन धर्मांमुळे किंवा दोन धर्मांमध्ये क्लेष होतो तेव्हा युद्ध अटळ ठरते आणि जबरदस्त विध्वंस होतो. युद्धामध्ये हार-जीत तर होणारच. पण जो जिंकतो त्याला खूप विध्वंस केल्याचा आनंद होतो. अर्थात जो जिंकतो त्याचेही कमी-अधिक प्रमाणात नुकसान झालेलेच असते.

५. सांस्कृतिक विवेचन : संस्कृती जपायची की तिचे परीक्षण करायचे? संस्कृती ही स्थिर नसते. ती सतत बदलत असते. आपले पूर्वज बैलगाडीतून प्रवास करायचे. आपण मोटारीतून प्रवास करतो. पूर्वी पत्रे लिहिली जात होती. आज डिजिटल संदेश पाठवले जातात. पूर्वी तेलाचे दिवे वापरले जात होते; आज एलईडी दिवे वापरले जातात. याचा अर्थ आपण संस्कृती सोडली, असा होत नाही. संस्कृतीचे जीवंतपण तिच्या बदल स्वीकारण्याच्या क्षमतेत असते. भारतीय संस्कृतीची मोठी ताकद म्हणजे तिची प्रश्न विचारण्याची परंपरा. उपनिषदांमध्ये प्रश्न आहेत. वेदांमध्ये चिंतन आहे. बुद्धीवाद्यांनी चिकित्सा केली. संतांनी कर्मकांडावर टीका केली. संत तुकाराम महाराजांनीही बाह्य अवडंबरापेक्षा अंतःकरणातील भक्तीला महत्त्व दिले. संत गाडगेबाबांनी स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजसेवेचा संदेश दिला. त्यांनी लोकांना देवाच्या नावाखाली होणाऱ्या अनावश्यक खर्चाऐवजी शिक्षण, आरोग्य आणि समाजकल्याणासाठी खर्च करण्यास प्रवृत्त केले. संतांचा संदेश हा परंपरा नष्ट करण्याचा नव्हता; तर परंपरेतील अनिष्ट गोष्टी दूर करून तिचा मूळ सात्त्विक आशय जीवंत ठेवण्याचा होता.

परंपरेचे तीन प्रकार

मूल्याधिष्ठित परंपरा : सत्य, दया, सेवा, ज्ञान, कुटुंबव्यवस्था आणि निसर्गसंवर्धन.

आनंदाधिष्ठित परंपरा : सण, उत्सव, संगीत, नृत्य, दीपोत्सव आणि सामूहिक आनंद.

कालबाह्य किंवा हानिकारक रूढी : ज्या प्रथा कालांतराने समाज, पर्यावरण किंवा व्यक्तिस्वातंत्र्याचे नुकसान करतात.

पहिल्या दोन प्रकारांचे जतन करणे आणि तिसऱ्या प्रकाराचे परीक्षण करून आवश्यक बदल करणे, हीच प्रगल्भ संस्कृतीची ओळख आहे. आजकाल आपण पाहतो, की पूर्वी मोठमोठे यज्ञ महिनोन्‌महिने चालायचे (अर्थात ऋषींच्या काळात), ते जवळपास बंद झाले आहेत. होळी हा देखील तसाच एक सण आहे. रंगपंचमीचेही प्रमाण कमी झाले आहे.

६) पर्यावरणीय विवेचन : माणसाच्या काही तासांच्या आनंदासाठी निसर्गाची किती मोठी किंमत? आज फटाक्यांच्या चर्चेतील सर्वांत गंभीर पैलू म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास. आपण दिवाळीला लक्ष्मीचे स्वागत करतो. पण लक्ष्मी म्हणजे केवळ पैसा नाही. समृद्धीमध्ये आरोग्य, स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, सुरक्षित अन्न आणि निसर्गाचे संतुलन यांचाही समावेश होतो. मग प्रदूषण वाढवून आपण नेमकी कोणती समृद्धी मिळवत आहोत?

अ) हवेचे प्रदूषण : फटाके जाळल्यामुळे विषारी सूक्ष्म धूलीकण वातावरणात मिसळतात. याशिवाय सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड आणि विविध धातूंची संयुगे वातावरणात पसरू शकतात.

ब) फटाक्यांच्या आवाजामुळे : श्रवणशक्तीवर परिणाम होऊ शकतो. वृद्ध आणि आजारी व्यक्तींना त्रास होऊ शकतो. लहान मुलांच्या झोपेवर परिणाम होऊ शकतो. तणाव, अस्वस्थता आणि झोपेचे विकार वाढू शकतात.

क) प्राणी आणि पक्ष्यांवरील परिणाम : माणसाला फटाके मनोरंजन वाटतात; परंतु प्राण्यांसाठी तो अचानक होणारा प्रचंड ध्वनी आणि प्रकाशाचा धक्का असतो. कुत्रे, मांजरे, पक्षी आणि इतर प्राणी घाबरतात. काही प्राणी पळून जातात, जखमी होतात किंवा मानसिक तणाव अनुभवतात. आपण माणसांच्या आनंदासाठी प्राण्यांच्या भीतीकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे का?

ड) कचरा आणि जलप्रदूषण : फटाक्यांनंतर कागद, प्लास्टिक, धातूंचे अवशेष आणि रासायनिक पदार्थ रस्त्यावर पडतात. पावसाच्या पाण्याबरोबर त्यातील काही घटक नाले आणि जलस्रोतांपर्यंत पोहोचू शकतात. यामुळे स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षण यांच्यावर अतिरिक्त भार पडतो. अशा परिस्थितीत सणांच्या काळात निर्माण होणारे अतिरिक्त प्रदूषण ही केवळ वैयक्तिक निवडीची बाब राहत नाही. ती सार्वजनिक आरोग्य आणि नागरी व्यवस्थापनाची समस्या बनते. निसर्ग आपल्याला वारसा म्हणून मिळालेला नाही, तो पुढच्या पिढीकडून घेतलेला ठेवा आहे. आपण आपल्या मुलांना फक्त सणांच्या परंपरा देणार आहोत की श्वास घेण्यायोग्य हवा आणि सुरक्षित पर्यावरणही देणार आहोत?

७) राजकीय विवेचन : धर्माच्या नावाने होणारे राजकारण आणि सामाजिक संघर्ष आपण रोजच पाहत आहोत. राजकारणी लोक धर्माच्या नावाने उत्तेजन देतात. पण ४-५ दिवसांतच त्यांच्याविरोधात बोलण्याची पाळी त्यांच्यावर येते. आज फटाक्यांचा विषय केवळ पर्यावरणापुरता मर्यादित राहिलेला नाही. तो धार्मिक अस्मिता, राजकीय भूमिका आणि सामाजिक संघर्ष यांच्याशी जोडला गेला आहे.

एका बाजूला काही लोक म्हणतात, की फटाके फोडणे हा आमच्या सणाचा आणि धार्मिक स्वातंत्र्याचा भाग आहे. दुसऱ्या बाजूला काही लोक म्हणतात, की फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण आणि इतरांना होणारा त्रास लक्षात घेता त्यावर नियंत्रण आवश्यक आहे. या दोन्ही बाजूंमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न हरवतो, तो म्हणजे आपल्या धर्माचे रक्षण करायचे आहे की फटाके फोडण्याच्या प्रथेचे? धर्म आणि एखादी विशिष्ट प्रथा या समान गोष्टी नाहीत. फटाके न फोडता दिवाळी साजरी केल्यास दिवाळीचे धार्मिक महत्त्व कमी होते का? दिवे लावणे, रांगोळी काढणे, लक्ष्मीपूजन करणे, कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करणे, गरजूंना मदत करणे आणि गोडधोड वाटणे यातून दिवाळीचा आनंद मिळू शकत नाही का? धार्मिक स्वातंत्र्याचा आदर झाला पाहिजे. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य, ध्वनिनियम आणि पर्यावरणविषयक कायद्यांचे पालनही झाले पाहिजे. धार्मिक श्रद्धा आणि वैज्ञानिक विवेक यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी त्यांचा समन्वय साधणे अधिक योग्य आहे. फटाक्यांबाबत राजकारणी लोकांचे मत जाणून न घेण्यातच धन्यता आहे.

८) अंतिम विवेचन : परंपरा जपताना विवेक शुद्धीवर ठेवून विचार केला पाहिजे. मला खालील पाच गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या वाटतात.

- इतिहास सांगतो, की प्रत्येक प्रथेचा एक उगम असतो. तो कारणांसह समजून घेणे आवश्यक आहे.
- विज्ञान सांगते, की प्रत्येक तांत्रिक शोधाचे फायदे आणि दुष्परिणाम असतात हे आजवर आपण पाहिले आहे.
- अध्यात्म सांगते, की बाह्य प्रदर्शनापेक्षा अंतःकरणातील शुद्धता महत्त्वाची आहे. संतांनी हेच सांगितले आहे.
- संस्कृती सांगते, की परंपरा जपताना काळानुसार बदल स्वीकारले पाहिजेत. काही दशकांपूर्वी मोटारसायकलवर महिला चष्मा घालून गुढीपाडव्याची मिरवणूक काढत नव्हते.
- पर्यावरण सांगते, की माणूस निसर्गाचा मालक नव्हे; तर त्याचा एक घटक आहे.

माझ्या मते, या विवेचनात कोणत्याही धर्माचा, श्रद्धेचा किंवा सणाचा अपमान करण्याचा हेतू नाही, गरज नाही किंबहुना तशी इच्छा देखील नाही. मला फक्त एवढेच वाटते, की पर्यावरणाच्या नावाखाली धार्मिक श्रद्धांची अवहेलना होता कामा नये किंवा त्यायोगे कुठलाही अयोग्य प्रकार होता कामा नये. आपल्याला आवश्यक आहे ती केवळ विवेकपूर्ण चिकित्सा.

जाता-जाता विचार करण्यासारखे काही प्रश्न

- पूर्वजांनी केलेली प्रत्येक गोष्ट आपण आजही करायलाच हवी का?
- एखादी गोष्ट शतकानुशतके सुरू आहे म्हणून ती वैज्ञानिकदृष्ट्या योग्य ठरते का?
- आपल्या आनंदामुळे दुसऱ्या जीवाला त्रास होत असल्यास त्या आनंदाचा पुनर्विचार करायला नको का?
- धर्माचे रक्षण करण्याच्या नावाखाली धर्मातील दया, करुणा आणि अहिंसा ही मूलभूत मूल्ये आपण विसरत तर नाही ना? मग तो कुठलाही धर्म असो.
- आपल्या पुढच्या पिढीला आपण काय देणार आहोत? अंधानुकरण की विचार करण्याची क्षमता?

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



भावनिक धक्का बसल्यानंतरही सोडली नाही जिद्द!

सक्सेस स्टोरी

७ वर्षांच्या संघर्षानंतर 'यूपीएससी'मध्ये मिळविला २३८ वा क्रमांक



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आयुष्यात आलेल्या वैयक्तिक संकटातून सावरत ध्येयाच्या दिशेने वाटचाल केली, तर कठीण परिस्थितीतही यश मिळविता येते, हे आयुष कृष्णा यांनी दाखवून दिले आहे. आयआयटी गुवाहाटीमधून शिक्षण पूर्ण करून कॅनडामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करणाऱ्या आयुष यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेची तयारी करण्यासाठी परदेशातील नोकरी सोडली.

२३ नोव्हेंबर २०१८ रोजी श्री. आयुष यांना मोठा भावनिक धक्का बसला. या भावनिक धक्क्यातून खचून न जाता त्यांनी स्वतःला सावरण्यासाठी आणि मानसिक स्थिरता मिळविण्यासाठी 'यूपीएससी'च्या तयारीचा मार्ग निवडला. तब्बल सात वर्षांच्या संघर्षानंतर त्यांनी यूपीएससी २०२५ मध्ये २३८ वा क्रमांक मिळवत आपले स्वप्न पूर्ण केले.

आयआयटीमधून शिक्षण, कॅनडामध्ये नोकरी

आयुष कृष्णा यांनी आयआयटी गुवाहाटी येथून आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांना कॅनडामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. चांगली नोकरी आणि परदेशातील करिअर असतानाही त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय निश्चित केले. एका मुलाखतीत त्यांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख केला.

दुःखातून सावरण्यासाठी 'यूपीएससी'ची तयारी

भावनिक धक्क्यानंतर निर्माण झालेली मानसिक अस्वस्थता आणि कॉर्पोरेट नोकरीतील मोकळा वेळ श्री. आयुष यांच्यासाठी त्रासदायक ठरत होता. या परिस्थितीत स्वतःला व्यस्त ठेवण्यासाठी त्याने 'यूपीएससी'च्या अभ्यासाला सुरूवात केली. आपली मानसिक स्थिरता टिकवणे आणि आयुष्यात निश्चित ध्येय असणे आवश्यक असल्याचे त्याला जाणवले. त्यानुसार त्याने उपलब्ध वेळेचा उपयोग अभ्यासासाठी केला. वैयक्तिक आयुष्यातील दुःख बाजूला ठेवून त्याने संपूर्ण लक्ष प्रशासकीय सेवेत जाण्याच्या उद्दिष्टावर केंद्रित केले.

सात वर्षांचा संघर्ष, सहा वेळा मुख्य परीक्षा

श्री. आयुष यांचा 'यूपीएससी'चा प्रवास अनेक अडथळ्यांनी भरलेला होता. सात वर्षांच्या या काळात त्यांनी सहा वेळा मुख्य परीक्षा दिली, तर पाच वेळा मुलाखतीच्या टप्यापर्यंत मजल मारली. वारंवार अपयश येऊनही त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. या काळात त्यांनी भारतीय परराष्ट्र सेवेत (आयएफएस) सहावा क्रमांक मिळविला. तसेच बिहार लोकसेवा आयोगाच्या (बीपीएससी) परीक्षेत नववा क्रमांकही पटकावला. मात्र, त्याचे अंतिम ध्येय भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) अधिकारी होण्याचे होते. त्यामुळे इतर यश मिळूनही त्याने आपली तयारी सुरूच ठेवली.

अभ्यासासाठी तंत्रज्ञान आणि शिस्तीचा वापर

श्री. आयुष यांच्या तयारीतील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांची अभ्यासाची पद्धत. नोकरी करत असताना ते दररोज पाच तास अभ्यासासाठी देत होते. उत्तरलेखनाचा सराव करण्यासाठी त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर केला. अभ्यास करताना मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांना प्राधान्य दिले. त्याचबरोबर त्यांना पूर्वीपासून डायरी लिहिण्याची सवय होती. या सवयीचा उपयोग त्यांनी 'यूपीएससी'च्या तयारीत केला. केवळ पुस्तकी अभ्यासावर अवलंबून न राहता नियोजनबद्ध पद्धतीने त्यांनी परीक्षेची तयारी केली.

यूपीएससी २०२५ मध्ये २३८ वा क्रमांक

सात वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर आयुष कृष्णा यांनी यूपीएससी २०२५ मध्ये २३८ वा क्रमांक मिळविला. अनेक वेळा मुख्य परीक्षा आणि मुलाखती देऊनही अपेक्षित यश मिळत नसताना त्यांनी आपले ध्येय बदलले नाही. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले. आयआयटीमधील शिक्षण, कॅनडातील नोकरी, वैयक्तिक आयुष्यातील भावनिक धक्का आणि 'यूपीएससी'तील वारंवार आलेले अपयश असा त्यांचा प्रवास राहिला. अशा तऱ्हेने अनेक प्रकारच्या मानसिक, भावनिक व शारिरीक अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न पूर्ण केले.

शिवरायांची राजधानी रायगड किल्ल्यावर गेल्यावर 'ही' ७ ठिकाणे पाहायला विसरू नका!



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रायगड किल्ला : छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर इतिहासाची साक्ष देणारी अनेक महत्त्वाची ठिकाणे आजही पाहायला मिळतात.

राजसभा आणि शिवरायांची समाधी : रायगडावरील राजसभेत छत्रपती शिवाजी महाराजांचा ऐतिहासिक राज्याभिषेक झाला, तर नगारखान्यासमोर महाराजांची समाधी आणि राजसभेजवळ त्यांचा पुतळा आहे.

जगदीश्वर मंदिर आणि गंगासागर तलाव : गडावरील जगदीश्वर मंदिर स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध असून गंगासागर तलावाला शिवराज्याभिषेकाशी संबंधित ऐतिहासिक महत्त्व आहे.

ऐतिहासिक बाजारपेठ आणि नगारखाना : रायगडावरील दोन्ही बाजूंना दुकानांच्या रांगा असलेली बाजारपेठ आणि राजदरबारापर्यंत आवाज पोहोचवणारी नगारखान्याची रचना आवर्जून पाहण्यासारखी आहे.

हिरकणी बुरूज आणि टकमक टोक : हिरकणी बुरुजाला हिरकणीच्या धाडसी पराक्रमाची कथा जोडलेली आहे, तर टकमक टोक हा गडावरील प्रसिद्ध आणि उंच कडा आहे.

महादरवाजा आणि वाघ दरवाजा : रायगडाचा मजबूत महादरवाजा मुख्य प्रवेशद्वार म्हणून ओळखला जातो, तर वाघ दरवाजा हा गडावरील महत्त्वाच्या ऐतिहासिक मार्गांपैकी एक आहे.

हत्तीखाना आणि शिर्काई देवी मंदिर : गडावरील हत्तीखाना, हत्ती तलाव आणि ग्रामदेवता शिर्काई देवीचे मंदिर पाहून रायगडाचा ऐतिहासिक वारसा अनुभवता येतो.

पाळीतील वेदना अन् वजन नियंत्रण!

महिलांसाठी दालचिनीचे ७ फायदे



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दालचिनी हा सुगंधी मसाला असून त्यात अँटिऑक्सिडंट आणि दाह कमी करण्यास मदत करणारे काही घटक असतात. शरीरातील काही प्रक्रियांवर त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. मात्र, हे फायदे प्रत्येक महिलेला मिळतीलच असे नाही.

मासिक पाळीचे चक्र नियमित ठेवण्यास मदत

काही संशोधनानुसार दालचिनीमुळे शरीराची इन्सुलिन वापरण्याची क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. इन्सुलिनच्या कार्यात सुधारणा झाल्यास हार्मोन्सच्या संतुलनावरही सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता असते.

प्रजनन क्षमतेसाठी फायदा

दालचिनीतील अँटिऑक्सिडंट घटक ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास मदत करू शकतात. पीसीओएस असलेल्या महिलांमध्ये इन्सुलिनच्या कार्यात सुधारणा झाल्यास अंडोत्सर्जनाच्या प्रक्रियेलाही फायदा होण्याची शक्यता आहे.

रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत

दालचिनीमध्ये सिनॅमल्डिहाइड नावाचे नैसर्गिक संयुग असते. हे इन्सुलिनच्या कार्यावर परिणाम करू शकते. काही संशोधनांमध्ये दालचिनीच्या सेवनामुळे उपाशीपोटी रक्तातील साखरेचे प्रमाण आणि इन्सुलिनचा प्रतिकार कमी झाल्याचे आढळले आहे.

हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते

दालचिनीच्या सेवनामुळे खराब कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्सचे प्रमाण कमी होण्याची शक्यता दिसून आली आहे. त्यामुळे हृदयाच्या आरोग्यासाठी दालचिनी उपयुक्त ठरू शकते, असा अंदाज व्यक्त केला जातो.

मासिक पाळीतील वेदना कमी करण्यास मदत

अनेक महिलांना मासिक पाळीदरम्यान पोटदुखी आणि अस्वस्थतेचा त्रास होतो. दालचिनीतील दाह कमी करणारे आणि स्नायूंचे आकुंचन कमी करण्यास मदत करू शकणारे घटक या त्रासावर काही प्रमाणात परिणाम करू शकतात. दालचिनीचा चहा किंवा त्यातील घटकांवर झालेल्या काही अभ्यासांमध्ये मासिक पाळीतील वेदना कमी होण्याची शक्यता दिसून आली आहे. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत होऊ शकते वजन नियंत्रणासाठी शरीरातील चयापचय क्रिया महत्त्वाची असते. दालचिनीमुळे चयापचय क्रियेला चालना मिळते आणि भूक नियंत्रित राहते, असा दावा काही ठिकाणी केला जातो.

त्वचेच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते

दालचिनीमध्ये अँटिऑक्सिडंट घटक असतात. हे घटक शरीरातील फ्री रॅडिकल्समुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करू शकतात. दालचिनीमध्ये काही जीवाणूंविरोधी गुणधर्मही आढळतात. त्यामुळे मुरुमांवर ती फायदेशीर ठरू शकते. दालचिनीचे सेवन करताना कोणती काळजी घ्यावी? दालचिनीचे फायदे असले तरी तिचे अतिसेवन आरोग्यासाठी त्रासदायक ठरू शकते.

फक्त भाजी नाही, सुपरफूड आहे बटाटा!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपण बटाट्याला अनेकदा वजन वाढवणारा शत्रू समजतो, पण योग्य प्रमाणात खाल्ल्यास तो ऊर्जा, फायबर आणि अनेक जीवनसत्त्वे देणारे एक उत्तम सुपरफूड ठरतो. बटाट्यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास आणि बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळवून देण्यास मदत करते. बटाट्यामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण उत्तम असते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. दिवसभर एनर्जेटिक राहण्यासाठी बटाटा हा उत्तम आहार आहे. 'द जर्नल ऑफ न्यूट्रिशन'नुसार बटाट्यामध्ये आढळणारे पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

बटाट्यामध्ये त्वचेच्या पेशींचे रक्षण करणारे व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. बटाट्यामधील व्हिटॅमिन बी ६ मेंदूच्या आरोग्यासाठी आणि न्यूरोट्रांसमीटरच्या निर्मितीसाठी आवश्यक असते. यामुळे मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते.

व्हिटॅमिन सी ने समृद्ध असलेला बटाटा शरीराची प्रतिकारशक्ती वाढवून विविध संसर्गांशी लढण्यास मदत करतो. इंग्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ सरी मधील संशोधनानुसार, बटाटा शिजवून थंड झाल्यावर 'रेसिस्टंट स्टार्च'पोटाची चरबी कमी करण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. बटाटा तळण्याऐवजी उकडलेला, भाजलेला किंवा सूपमध्ये खाल्ल्यास त्याचे सर्व पोषक घटक शरीराला मिळतात.

गुगल पे, फोन पे वापरणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी!

'एनपीसीआय'ची नवी योजना, पाहा काय होणार फायदा?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

डिजिटल पेमेंटचा वापर आता छोट्या दुकानांपासून ते मोठ्या मॉलपर्यंत सर्वत्र होतो. किराणा दुकान असो किंवा भाजी विक्रता, प्रत्येक ठिकाणी 'गुगल पे' आणि 'फोन पे' पैसे देता येतात. आता अशा डिजिटल पेमेंटला आणखी चालना देण्यासाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) ने नवीन योजना आणली आहे. या योजनेमुळे छोट्या दुकानदारांना यूपीआय क्यूआर कोड आणि साउंडबॉक्स बसवण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन मिळणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या योजनेंतर्गत ३०० ते ७५० रुपयांपर्यंत इन्सेन्टिव्ह मिळू शकते. त्यामुळे नेमकी ही योजना काय आहे आणि कोणला याचा फायदा होईल हे जाणून घेऊया.

दुकानदारांना ७५० रुपयांपर्यंत इन्सेन्टिव्ह

'एनपीसीआय'च्या नवीन योजनेनुसार दुकानदारांना डिजिटल पेमेंटची सुविधा सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. नवीन दुकानदाराने पहिल्यांदा यूपीआय क्यूआर कोड बसविल्यावर ३०० रुपयांचे इन्सेन्टिव्ह



मिळेल. पेमेंटचा आवाजात अलर्ट मिळण्यासाठी साउंडबॉक्स बसवल्यावर ७५० रुपयांचे इन्सेन्टिव्ह दिले जाईल. २००० रुपयांपर्यंतच्या पात्र यूपीआय व्यवहारांनाही प्रोत्साहन योजनेचा लाभ मिळेल.

कोणाला मिळणार योजनेचा लाभ?

तर या योजनेचे उद्देश हा लहान आणि मध्यम व्यापाऱ्यांना डिजिटल पेमेंटशी जोडण्याचा आहे. ज्या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल ४० लाख रुपयांपर्यंत असते, अशा पात्र दुकानदारांना या योजनेचा लाभ मिळेल. त्यामुळे किराणा दुकानदार, फेरीवाले आणि लहान रिटेल व्यावसायिकांचाही समावेश आहे.

ग्रामीण भागातील दुकानदारांवर विशेष लक्ष

देशातील छोट्या शहरांमध्ये आणि दुर्गम भागांमध्ये डिजिटल पेमेंटचा वापर वाढवण्यावर भर दिला जाईल. विशेषतः टियर-३ ते टियर-६ शहरांसोबत ईशान्येकडचे राज्ये, जम्मू-काश्मीर आणि लडाखमधल्या व्यापाऱ्यांना यूपीआयशी जोडण्याचे उद्दिष्ट आहे.

तीन वर्षे सुरू राहणार योजना

ही योजना यूपीआय मर्चेंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू झाल्याच्या तारखेपासून पुढील तीन वर्षांसाठी सुरू राहील. यासाठी निधीचेही नियोजन करण्यात आले आहे. एकूण निधीपैकी ३० टक्के नवीन व्यापारी जोडण्यासाठी ५० टक्के व्यवहार वाढविण्यासाठी आणि २० टक्के निवडक भागांच्या विकासासाठी वापरला जाईल.

आदर्श हायस्कूलच्या चेअरमनपदी पी. वाय. पाटील यांची निवड

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक संस्थेच्या अमळगाव (ता. अमळनेर) येथील आदर्श माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या किमान कौशल्य विभागाच्या चेअरमनपदी अमळगावचे तात्यासाहेब श्री. पी. वाय. पाटील यांची नियुक्ती झाली आहे. सदर नियुक्तीसंबंधी संस्थेचे मानद सचिव श्री. निलेश भोईटे यांनी १५ नोव्हेंबर २०२६ च्या पत्रान्वये कळविले आहे. श्री. पाटील हे विजय कर्मचारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून. एम. एस. ई. बी. वर्कर्स फेडरेशनचे केंद्रीय पदाधिकारी आहेत. तसेच अमळनेर तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष असून, ते सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल अमळनेर तालुका काँग्रेस कमिटी व इतर मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मंगरूळजवळ दोन वाहनांचा अपघात; चारचाकीच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल


ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील धुळे रोडवरील मंगरूळजवळ चारचाकी व दुचाकी वाहनांचा भीषण अपघात झाला. ही घटना उघडकीस आली असून, दुचाकीचालक गंभीर जखमी झाला आहे. त्यामुळे चारचाकीच्या चालकाविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. संजय जगन्नाथ मिस्तरी (रा. अमळनेर) यांनी फिर्याद दिली, की माझा चुलतभाऊ भूषण खैरनार (रा. मंगरूळ, ता. अमळनेर) हा शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास दुचाकीवरून (एमएच १२-एलएक्स ७८२५) अमळनेरकडून मंगरूळकडे जात असताना धुळ्याकडून अमळनेरकडे येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या सेल्टोस (जीजे ५ -आरडब्लू ०२२०) चालक उल्हास सुधाकर पवार (रा. पटवारी कॉलनी, अमळनेर) याने भरधाव वेगाने येत समोरून येणाऱ्या भूषणच्या दुचाकीला सेंट मेरी शाळेजवळील रस्त्यावर जोरदार धडक दिली. यात दुचाकी व चारचाकी दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून, भूषणला गंभीर दुखापत झाली आहे. या अपघातास चारचाकीचालक उल्हास पवार जबाबदार आहे. हवालदार मुकेश साळुंखे तपास करीत आहेत.

इंदुरीकर महाराजांचे उद्या भिलाली फाट्यावर कीर्तन

अमळनेर : येथील बाजार समितीचे माजी संचालक तथा भिलालीचे माजी सरपंच स्व. आप्पासाहेब पावबा अमृत पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता भिलाली फाटा (ता. अमळनेर) येथे जाहीर कीर्तनाचे आयोजन केले आहे. यावेळी प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे कीर्तन होणार आहे. परिसरातील भाविक व नागरिकांनी या कीर्तनाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजक भिकेश पावबा पाटील (माजी उपसभापती, पंचायत समिती, अमळनेर), डॉ. सचिन पावबा पाटील व श्री. भिकेशभाऊ मित्रपरिवार, भिलाली यांनी केले आहे.

॥ मंगल ॥ पान



मालक म्हणजे कोण?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मालक म्हणजे दगडाला आकार देणारा मूर्तिकार. मालक म्हणजे त्या मूर्तिमध्ये जीव भरणारा कृपावंत. मालक म्हणजे प्रत्येक भक्ताच्या दगडी मनात गाभारा करणारा कारागीर. मालक म्हणजे जीवनात आपला शेवटचा नाहीतर पहिला एकमेव एक पर्याय. मालक म्हणजे काहीतरी द्यायला किंवा काही पूर्ण करायला जीवनात आला नाहीतर जीवन पूर्णत्वाला न्यायला आलेला वाटाड्या. मालक म्हणजे भाग्याच्या रेषा हातावर नसताना त्या अचूक उमटवून भाग्यात नाही ते देणारा भाग्यकार. मालक म्हणजे दमलेल्या थकलेल्या जीवनाच्या वाटेवरील आपला प्रवास सुखकर करणारा सहप्रवासी. मालक म्हणजे ज्याच्या नुसत्या स्पर्शाने राशींचा खेळ, पत्रिका, हस्त रेषा, कुंडली, भाग्य, नशीब अन् यातही नाही ते सगळे देणारा त्यांचा शंकरस्पर्श.

।। श्री स्वामी समर्थ महाराज की जय॥
॥ सद्गुरू श्री शंकर महाराज की जय॥



गणपती स्तोत्र

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपण असंख्य वेळेला हे 'गणपती स्तोत्र', 'संकटनाशन स्तोत्र' म्हणतो. परंतु यामध्ये उल्लेख केलेल्या श्रीगणेशांची प्रत्यक्ष स्थाने आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नाहीत.

नारदकृत- 'संकटनाशन' स्तोत्रात उल्लेखिलेली बारा नावे व त्यांची सद्यस्थाने.

प्रथमं वक्रतुण्ड च
एकदन्तं द्वितीयकम् ।
तृतीयं कृष्णपिङ्गाक्षं
गजवक्त्रं चतुर्थकम्
लम्बोदरं पंचमं च
षष्ठ विकटमेव च ।
सप्तमं विघ्नराजेन्द्रं
धूम्रवर्णं तथाष्टमम्
नवमं भालचन्द्रं च
दशमं तु विनायकम् ।
एकादशम् गणपति
द्वादशं तु गजाननम्

१) वक्रतुण्ड : मद्रास राज्यातील कननूरजवळ
२) एकदन्त : पश्चिम बंगालमध्ये कोलकत्याजवळ.
३) कृष्णपिंगाक्ष : मद्रास राज्यातील कन्याकुमारीजवळ.
४) गजवक्त्र : ओरिसातील भुवनेश्वर येथे.
५) लंबोदर : याची दोन स्थाने उल्लेखिली जातात. (१) रत्नागिरी जिल्ह्यातील गणपती पुळे क्षेत्रात (२) मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर या प्रसिद्ध ज्योतिर्लिंगाजवळ असलेला पंचमुखी गणपती.
६) विकट : हिमालयाच्या पायथ्याशी ऋषीकेश येथे.
७) विघ्नराजेन्द्र : कुरुक्षेत्रात कौरव-पांढवांच्या युद्धभूमीजवळ.
८) धूम्रवर्ण : १) दक्षिणेकडील केरळ राज्यात कालिकतजवळ. २) तिबेटमध्ये ल्हासापासून १५ मैलांवर.
९) भालचंद्र : रामेश्वरजवळ धनुष्कोडी येथे मद्रास राज्य.
१०) विनायक : काशी क्षेत्रातील अन्नपूर्णा मंदिराजवळचा धुण्डिराज श्रीगणेश.
११) गणपती बाप्पा : क्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर येथील द्विभूज महागणपती.
१२) गजानन : हिमालयातील शेवटचे तीर्थस्थान पांडुकेसर येथील मुंडकटा गणेश. गौरी कुंडाजवळील ही श्रीगणेशमूर्ती शिरविरहित आहे.

समर्थ रामदास स्वामींनी ही बाराही गणेशस्थाने शोधून काढून सर्व गणपतींचे दर्शन घेतले होते, असे म्हणतात.

॥ जय श्री गणेश ॥



गोपाष्टमी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय संस्कृति में गाय को माता का स्थान दिया गया है..। जिस प्रकार माँ अपने बच्चे का लालन- पालन व सुरक्षा करती है, उसी प्रकार गौ का दूध आदि भी मनुष्य का लालन- पालन तथा स्वास्थ्य व सद्गुणों की सुरक्षा करते हैं। गाय की पूजा, परिक्रमा व स्पर्श स्वास्थ्य, आर्थिक व आध्यात्मिक उन्नति की दृष्टि से महत्वपूर्ण है। गाय को श्रद्धा व प्रेमपूर्वक सहलाते रहने से कुछ महीनों में असाध्य रोग भी ठीक हो जाते हैं....।

अर्थशास्त्र का मूलाधार : देशी गाय..।

गौ- विज्ञान सम्पूर्ण विश्व को भारत की अनुपम देन है..। भारतीय मनीषियों ने सम्पूर्ण गोवंश को मानव के अस्तित्व, रक्षण, पोषण, विकास और संवर्धन के लिए अनिवार्य पाया। गोदुग्ध ने जन-समाज को विशिष्ट शक्ति, बल व सात्त्विक बुद्धि प्रदान की। गोबर व गोमूत्र खेती के लिए पोषक हैं, साथ ही ये रोगाणुनाशक, विषनाशक व रक्तशोधक भी हैं। मृत पशुओं से प्राप्त चर्म से चर्मोद्योग सहित अनेक हस्तोद्योगों का विकास हुआ। अतः प्राचीन काल से ही गोपालन भारतीय जीवन-शैली व अर्थव्यवस्था का सदैव केन्द्रबिन्दु रहा है। जीवन के समस्त महत्त्वपूर्ण कार्यों के समय पंचगव्य का उपयोग किया जाता था। विज्ञान व कम्पयूटर के युग में भी गौ की महत्ता यथावत् बनी हुई है....।

गाय परम उपयोगी कैसे ..?

मानव- जाति की समृद्धि गाय की समृद्धि के साथ जुड़ी है..। देशी गाय का दूध, दही, घी, गोबर व मूत्र सम्पूर्ण मानव जाति के लिए वरदानरूप हैं। गाय के दूध से निकला घी 'अमृत' कहलाता है। स्वर्ग की अप्सरा उर्वशी राजा पुरुरवा के पास गयी तो उसने अमृत की जगह गाय का घी पीना ही स्वीकार किया: घृतं में वीर भक्ष्यं स्यात् ....।

गाय की महिमा बताते हुए पूज्य बापू जी कहते हैं- "गाय के शरीर में ही 'सूर्यकेतु नाड़ी' होती है जिससे वह सूर्य की गो किरणों को शोषित करके स्वर्णक्षार में बदल सकती है..। स्वर्णक्षार जीवाणुनाशक हैं और रोगप्रतिकारक शक्ति की वृद्धि करते हैं। गाय के दूध व घी में स्वर्णक्षार पाये जाते हैं, जो भैंस, बकरी, ऊँट के दूध में नहीं मिलते....।

गोबर और गोझरण मिलाकर महीने में एकाध बार रगड़- रगड़कर नहाने से शरीर में जो तेजस्विता आती है, वह तो आजमा के देख लें, बहुत स्वास्थ्य- लाभ होता है....। गोमूत्र अवश्य पीना चाहिए। यह बीमारियों की जड़ें काट के निकाल देता है। यकृत व गुर्दे (किडनी) की खराबी, मोटापा, उच्च रक्तचाप, कोल्स्ट्रोल-वृद्धि, पाचन आदि सब ठीक कर देगा गोमूत्र। अब सब लोग गोमूत्र कहाँ ढूँढने जायें इसलिए ७८०० गौओं की सेवा व निवास के लिए अलग- अलग गौशालाएँ बनायीं और वहाँ विधिपूर्वक गोमूत्र से उसका अर्क बनता है। २०-३० मि.ली. यह गोझरण अर्क एक कटोरी पानी में डालकर पियो तो गोमूत्र पीने का फायदा होगा.....।"

विशेषः ये सभी लाभ देशी गाय से ही प्राप्त होते हैं, जर्सी व होल्सटीन से नहीं....।

'गोविन्द' और गोपाष्टमी का रहस्य..

कार्तिक शुक्ल प्रतिपदा से सप्तमी तक गायों तथा गोप- गोपियों की रक्षा के लिए भगवान ने गोवर्धन पर्वत को धारण किया था..। ८ वें दिन इन्द्र अहंकाररहित होकर भगवान की शरण में आये। कामधेनु ने श्रीकृष्ण का अभिषेक किया और उस दिन भगवान का नाम गोविंद पड़ा। इसी समय से कार्तिक शुक्ल अष्टमी को गोपाष्टमी का पर्व मनाया जाने लगा....।

गोपाष्टमी को क्या करें.. ?

सब प्रकार की अभीष्ट सिद्धि एवं सौभाग्य की वृद्धि चाहने वाले को इस दिन प्रातःकाल गायों को स्नान कराके गंध-पुष्पादि से उनका पूजन करना चाहिए..। गोग्रास देकर उनकी परिक्रमा करके थोड़ी दूर तक उनके साथ जाना चाहिए। सायंकाल गायें चर के जब वापस आयें, तो उस समय भी उनका आतिथ्य, अभिवादन और पंचोपचार- पूजन करके उन्हें कुछ खिलाकर उनकी चरणरज माथे पर लगानी चाहिए....।

गायों की रक्षा का संकल्प

इस पर्व पर गोरक्षा का संकल्प लेना चाहिए..। गोहत्या का कड़ा विरोध करना चाहिए। किसान गाय, बछड़ा, बैल आदि को बेचें नहीं। दूध न देने वाली गाय अथवा बूढ़ा बैल जितना घास (चारा) खाते हैं, उतना गोबर और गोमूत्र के द्वारा अपना खर्चा निकाल देते हैं। हर व्यक्ति को केवल गाय के ही दूध-घी का उपयोग कर गोसेवा में कम-से-कम इतना योगदान तो अवश्य देना चाहिए....।

सूर्य गोचराने 'या' ६ राशींचे नशीब पालटणार!

नोकरी, पैसा अन् प्रतिष्ठेतही होणार मोठी वाढ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सूर्य, ग्रहांचा राजा, दर महिन्याला आपली राशी बदलतो. त्यामुळे सूर्याला एक राशीचक्र पूर्ण करण्यासाठी सुमारे एक वर्ष लागते. सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सूर्याने वृश्चिक राशीत प्रवेश केला आहे. सूर्याचे वृश्चिक राशीतील हे संक्रमण जवळपास एका वर्षानंतर होत आहे. सूर्य या राशीत एक महिना म्हणजेच १६ डिसेंबर २०२६ पर्यंत राहील. मंगळ हा वृश्चिक राशीचा स्वामी आहे. ज्योतिषशास्त्रानुसार मंगळ आणि सूर्य यांच्यात एक घनिष्ठ मैत्री आहे. सूर्य हा धैर्य, ऊर्जा, पितृत्व आणि आत्मविश्वासाचा घटक मानला जातो, तर मंगळ भूमी, रक्त, ऊर्जा आणि धैर्याचे प्रतिनिधित्व करतो. या दोन ग्रहांमधील मैत्रीमुळे जेव्हा सूर्य वृश्चिक राशीत प्रवेश करतो तेव्हा त्याचा प्रभाव वाढतो. वृश्चिक राशीतील संक्रमणादरम्यान सूर्यावर मंगळाचा प्रभाव असतो आणि त्याचा मेष ते मीन राशींपर्यंतच्या राशींवर खोलवर परिणाम होतो.

ज्योतिषशास्त्रीय गणनेनुसार वृश्चिक महिना अनेक राशींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणेल. या काळात भाग्यवान राशींना आर्थिक आणि व्यावसायिक विकासात सकारात्मक परिणाम आणि संधी मिळतील.



सूर्याचे गोचर नशीब बदलणार

मिथुन : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे हे गोचर अत्यंत शुभ ठरू शकते. नोकरी आणि व्यवसायात प्रगतीच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी तुमचे कौशल्य आणि मेहनत वरिष्ठांच्या लक्षात येईल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे. शत्रूवर मात करण्यात यश मिळेल. आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत होईल. रखडलेली कामे मार्गी लागण्याचे संकेत आहेत.

सिंह : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे गोचर संमिश्र परिणाम देणारे ठरू शकते. घर, कुटुंब आणि मालमत्तेशी संबंधित विषयांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. घर किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करणाऱ्यांना योग्य संधी मिळू शकते. आईच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. कामाच्या ठिकाणी काही जबाबदाऱ्या वाढू शकतात. आर्थिक बाबतीत विचारपूर्वक निर्णय घेणे फायदेशीर ठरेल. कौटुंबिक वातावरणात शांतता राखण्याचा प्रयत्न करा.

कर्क : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे गोचर काही सकारात्मक बदल घेऊन येऊ शकते. शिक्षण, प्रेमसंबंध आणि संततीशी संबंधित बाबींमध्ये चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात एकाग्रता वाढवता येईल. नोकरीत नवीन संधी मिळू शकतात. गुंतवणुकीच्या बाबतीत योग्य नियोजन केल्यास फायदा होऊ शकतो. प्रेमसंबंधांमध्ये संवाद सुधारेल. मात्र, कोणताही आर्थिक निर्णय घाईघाईने घेऊ नका.

वृश्चिक : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे गोचर विशेष महत्त्वाचे ठरणार आहे. कारण सूर्य तुमच्या राशीतच प्रवेश करणार आहे. या काळात आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती वाढू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या नेतृत्वगुणांना वाव मिळेल. नोकरीत नवीन जबाबदारी किंवा पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. समाजात मान-सन्मान वाढू शकतो. अनेक दिवसांपासून रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी हा काळ अनुकूल ठरू शकतो. मात्र, रागावर नियंत्रण ठेवणे आणि अहंकार टाळणे महत्त्वाचे ठरेल.

मीन : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे गोचर भाग्याची साथ देणारे ठरू शकते. त्यामुळे नशीब आणि मेहनतीची चांगली सांगड घालता येईल. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यांमध्ये रुची वाढेल. लांबच्या प्रवासाचे योग निर्माण होऊ शकतात. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा काळ अनुकूल ठरू शकतो. नोकरी आणि व्यवसायात नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. वडीलधाऱ्या व्यक्तींचे मार्गदर्शन फायदेशीर ठरेल. आर्थिक स्थितीत हळूहळू सुधारणा होऊ शकते.

कुंभ : या राशीच्या लोकांसाठी सूर्याचे गोचर करिअरच्या दृष्टीने लाभदायक ठरू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या मेहनतीचे कौतुक होईल. वरिष्ठांकडून महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. सरकारी क्षेत्राशी संबंधित कामांमध्ये सकारात्मक परिणाम मिळू शकतात. व्यवसाय करणाऱ्यांना नवीन संधी मिळू शकतात. समाजात प्रतिष्ठा वाढण्याचे संकेत आहेत. आर्थिक बाबतीतही चांगले बदल अनुभवायला मिळू शकतात.

नवग्रह यंत्र : नवकोण/नवखंडाकार

नवग्रह यंत्र किसी एक देवता का यंत्र नहीं है, बल्कि वैदिक-ज्योतिषीय परंपरा में पूजित नौ ग्रह-देवताओं सूर्य, चंद्र, मंगल, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु और केतु को समर्पित यंत्र है। राहु और केतु को पारंपरिक रूप से छाया-ग्रह माना जाता है। नवकोण / नवखंडाकार डिजाइन में प्रत्येक खंड को एक ग्रह के लिए समर्पित किया जा सकता है और मध्य भाग में सूर्य को रखा जा सकता है।

नवग्रह पूजा का उद्देश्य परंपरा में ग्रहों के प्रति श्रद्धा, शांति और संतुलन की कामना करना है; इसे निश्चित भविष्यफल या किसी समस्या के समाधान की गारंटी नहीं मानना चाहिए।

नौ ग्रह और उनका पारंपरिक भाव
सूर्य : तेज, आत्मविश्वास और नेतृत्व
चंद्र : मन, भावनाएँ और शांति
मंगल : साहस, ऊर्जा और पराक्रम
बुध : बुद्धि, वाणी और विवेक
गुरू : ज्ञान, धर्म और सद्बुद्धि
शुक्र : सौंदर्य, सुख और कला
शनि : कर्म, अनुशासन और धैर्य
राहू : छाया, परिवर्तन और आत्मचिंतन
केतू : वैराग्य, आध्यात्मिकता और अंतर्दृष्टि


नवग्रह यंत्र की सरल पूजा विधि

सुबह स्नान करके स्वच्छ वस्त्र धारण करें। पूजा स्थान को साफ करके लाल, पीले या सफेद वस्त्र पर नवग्रह यंत्र स्थापित करें।

सबसे पहले श्रीगणेश का स्मरण करें
॥ ॐ गं गणपतये नमः ॥
इसके बाद यंत्र पर स्वच्छ जल या गंगाजल का हल्का छिड़काव करें। दीपक और धूप जलाकर नौ ग्रहों का ध्यान करें। पुष्प, अक्षत और अपनी श्रद्धानुसार नैवेद्य अर्पित करें। फिर प्रत्येक ग्रह को क्रम से प्रणाम करते हुए उसके मंत्र का जाप करें। सामान्य घरेलू पूजा में प्रत्येक मंत्र ११, २१ या १०८ बार जपा जा सकता है। परंपरागत नवग्रह पूजा में ग्रहों को क्रम से आवाहन और उपचार अर्पित करने की विधि भी मिलती है।

नौ ग्रहों के सरल मंत्र

सूर्य : ॥ ॐ सूर्याय नमः॥



चंद्र : ॥ ॐ चन्द्राय नमः ॥
मंगल : ॥ ॐ मंगलाय नमः ॥
बुध : ॥ ॐ बुधाय नमः ॥
गुरू : ॥ ॐ गुरवे नमः ॥
शुक्र : ॥ ॐ शुक्राय नमः ॥
शनि : ॥ ॐ शनैश्चराय नमः ॥
राहू : ॥ ॐ राहवे नमः॥
केतू : ॥ ॐ केतवे नमः॥
ये सरल नवग्रह मंत्र विभिन्न पूजा-पद्धतियों में प्रचलित हैं। अंत में सभी ग्रहों को एक साथ प्रणाम करें
॥ ॐ सूर्यादि नवग्रहेभ्यो नमः ॥

और प्रार्थना करे "हे नवग्रह देवताओ, मेरे जीवन में सद्बुद्धि, शांति, धैर्य, धर्म और सकारात्मक कर्मों की वृद्धि हो। जो भी ग्रहगत चुनौतियाँ हों, उनका सामना करने की शक्ति और विवेक प्रदान करें।"

नवग्रह विशेष अष्टक

सूर्यं तेजोमयं वन्दे, चन्द्रं शीतलरश्मिकम् ।
॥ मंगलं शक्तिरूपं च, बुधं बुद्धिप्रदायकम् ॥ १ ॥
गुरुं ज्ञानमयं वन्दे, शुक्रं सौख्यप्रदायकम् ।
॥ शनिं कर्मफलाध्यक्षं, प्रणमामि शनैश्चरम् ॥ २ ॥
राहुं छायास्वरूपं च, केतुं ज्ञानप्रकाशकम् ।
॥ नवग्रहान् नमस्यामि, सर्वमंगलदायकान् ॥ ३ ॥
तेजः शान्तिं च मे देहि, धैर्यं बुद्धिं विवेककम् ।
॥ सदाचारं शुभं कर्म, देहि देवाः नमोऽस्तु वः ॥ ४ ॥
मनसः शान्तिमाप्नोमि, कर्मणां फलमुत्तमम् ।
॥ धर्ममार्गे स्थिरं चित्तं, नवग्रहाः प्रयच्छतु ॥ ५॥
भयशोकविनाशाय, सद्बुद्धेः वृद्धये तथा ।
॥ नवग्रहकृपां याचे, भक्तियुक्तेन चेतसा ॥ ६ ॥
सूर्यादिकेतुपर्यन्तं, ग्रहाणां शक्तिरूपिणाम् ।
॥ नमामि चरणद्वन्द्वं, शरणं मे भवेदिह ॥ ७ ॥
सर्वे ग्रहाः शुभं यच्छन्तु, सर्वे सन्तु निरामयाः ।
॥ सर्वमंगलमांगल्यं, नवग्रहाः प्रयच्छतु ॥ ८॥

॥ इति श्री नवग्रह विशेष अष्टकम् ॥



लक्ष्मीची पावले दरवाजाबाहेर की आतल्या बाजूला शुभ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दिवाळी सण म्हटला की देवी लक्ष्मीचे पूजन आलेच. हिंदू धर्मात देवी लक्ष्मी यांना धन, वैभव, सुख आणि समृद्धीची देवता मानले जाते. त्यामुळे दिवाळी, लक्ष्मीपूजन तसेच शुक्रवारच्या दिवशी अनेक घरांमध्ये मुख्य दरवाजाजवळ देवी लक्ष्मी यांची पावले काढण्याची परंपरा आहे. मात्र, लक्ष्मीची पावले दरवाजाच्या बाहेर काढावीत की आतल्या बाजूला, त्यांची दिशा कोणती असावी आणि त्यामागे नेमकी धार्मिक मान्यता काय आहे, याबाबत अनेकांच्या मनात प्रश्न असतो. धार्मिक महत्त्व आणि शास्त्र जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

देवी लक्ष्मीची पावले कुठे काढावीत?

काही ठिकाणी मुख्य दरवाजाच्या बाहेरील बाजूला, तर काही ठिकाणी उंबरठ्याच्या आतील बाजूला लक्ष्मीची पावले काढण्याची प्रथा आहे. मात्र, धार्मिक मान्यतेनुसार देवी लक्ष्मींच्या पावलांची दिशा घराच्या आत येणारी ठेवली जाते. घराच्या प्रवेशद्वारापासून देवघरापर्यंत लक्ष्मीची पावले काढण्याची परंपराही अनेक ठिकाणी पाहावयास मिळते. यामागे देवी लक्ष्मींनी घरात प्रवेश करून कुटुंबावर कृपा करावी, अशी भावना असते. धार्मिक परंपरेनुसार लक्ष्मीची पावले घराच्या मुख्य दरवाजाजवळ काढताना त्या देवी घरात प्रवेश करीत असल्याप्रमाणे असावीत. म्हणजेच पावलांची बोटे घराच्या आतील दिशेला आणि टाचा बाहेरच्या दिशेला असाव्यात. यामागील



श्रद्धा अशी आहे, की देवी लक्ष्मी आपल्या घरात प्रवेश करीत असून त्यांच्या कृपेने घरात धनधान्य, सुख आणि समृद्धी नांदणार आहे.

लक्ष्मींची पावले कोणत्या दिशेला असावीत?

वास्तुशास्त्रातील प्रचलित मान्यतेनुसार उत्तर आणि ईशान्य दिशा शुभ मानल्या जातात. उत्तर दिशा ही कुबेराची दिशा मानली जाते, तर ईशान्य दिशा देवपूजेसाठी पवित्र समजली जाते. पूर्व दिशेलाही शुभ कार्यासाठी महत्त्व दिले जाते. त्यामुळे घराच्या रचनेनुसार या दिशांचा विचार केला जातो. मात्र लक्ष्मींची पावले काढताना ती घरात येत असल्याचे प्रतीक असणे अधिक महत्त्वाचे मानले जाते.

लक्ष्मींच्या पावलांमागे काय आहे धार्मिक महत्त्व ?

लक्ष्मींची पावले ही देवींच्या आगमनाचे प्रतीक मानली जातात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराची स्वच्छता करून मुख्य दरवाजापासून देवघरापर्यंत पावलांची रांग काढली जाते. काही घरांमध्ये ही पावले तिजोरी किंवा धन ठेवण्याच्या जागेपर्यंतही काढली जातात. देवी लक्ष्मींनी घरात प्रवेश करावा, कुटुंबातील सदस्यांना सुख, शांती, आरोग्य आणि आर्थिक समृद्धी लाभावी, अशी यामागील श्रद्धा आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)